लोकमत

न्यूज Inbox

# वारेगावच्या शाळेला जिल्हाधिकाऱ्यांची भेट

नागपूर : कामठी तालुक्यातील वारेगाव येथे असलेल्या समाज कल्याणच्या निवासी शाळेत नवीन मॉड्यूलर किचन व्यवस्था उभारण्यात आली आहे. राज्यात पहिलाच प्रयोग असून, या मॉड्यूलर किचनची तपासणी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केली. तसेच येथील सायन्स पार्कचीही पाहणी केली.

समाज कल्याण विभागाकडून निवासी शाळा तयार करण्यात आल्या आहेत. कामठी तालुक्यातील वारेगाव येथे ही निवासी शाळा सुरू करण्यात आली असून, येथे २०० विद्यार्थी संख्या आहे. जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांच्या मार्गदर्शनात निवासी शाळेत मॉड्यूलर किचन सुविधा उभी करण्यात आली.

Hello Nagpur
Page No. 4 Jul 29, 2024
Powered by: erelego.com